# समिती दर्पण

जानेवारी–फेब्रुवारी २०२३



**विद्यार्थी साहाय्यक समिती** : दूरध्वनी : ०२०–२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पाहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्चशिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरवात झाली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृहे आहे. त्यात ७५० विद्यार्थी– विद्यार्थिनींची निवास– भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# कलागुणांना वाव देणारा विद्यार्थ्यांचा ‘उत्कर्ष’

## विविध स्पर्धा आणि खेळांमध्ये १५० मुलामुलींचा सहभाग

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या ऊर्जा या युवा महोत्सवाची सुरुवात २०१९ मध्ये झाली. विविध स्पर्धा व खेळ यांचे आयोजन करून समितीच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, हा पहिला युवा महोत्सव आयोजित करण्यामागील मूलमंत्र होता. कारण समिती हे विद्यार्थी परिवर्तनाचे केंद्र मानले जाते. त्यानंतर त्याचे रुपांतर उमंग २०२० मध्ये झाले आणि याच उमंगची भरभराट होताना यावर्षीचा युवा महोत्सव म्हणजे उत्कर्ष २०२३.

समितीच्या लजपतराय भवन वसतिगृहाच्या प्रांगणात ता. १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान उत्कर्ष २०२३ महोत्सव आयोजित करण्यात आला होता. १७ फेब्रुवारीला सकाळी दहा वाजता प्रसिद्ध उद्योजक, कथालेखक व युवा पिढीचे प्रेरणास्थान शरद तांदळे व मैत्र संस्थेच्या संस्थापिका सौ. मेधा पुरकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्‌घाटन झाले.

विद्यार्थी– विद्यार्थिनींच्या अंगभूत कौशल्यांना वाव देऊन त्यांच्यातील वेगळेपण सादर करण्यासाठी समितीच्या माध्यमातून एक मंच उपलब्ध करून चांगल्या गोष्टींच्या पाठीवर कौतुकाची थाप पडणे, हा उत्कर्षचा मुख्य उद्देश होता.



विद्यार्थी साहाय्यक समितीतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विद्यार्थी विकास केंद्राद्वारे विविध उपक्रम राबविले जातात. यातीलच एक म्हणजे समितीचा युवा महोत्सव उत्कर्ष २०२३. उत्कर्षमध्ये साधारण १५० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या सहभागी विद्यार्थ्यांचे पाच गट तयार करून प्रत्येक गटाला एका गडाचे नाव दिले आणि वक्तृत्व, काव्यवाचन, कथाकथन, वादविवाद, इंग्लिश पीपीटी प्रेझेंटेशन आणि इनोव्हेटिव्ह बिझनेस आयडिया कॉम्पिटिशन यासारख्या स्पर्धा व विद्यार्थ्यांच्या चाणाक्ष बुद्धीला वाव देणारे काही मजेशीर खेळ देखील घेण्यात आले. सर्व स्पर्धा आणि खेळातील विजेते ज्या गटाचे सदस्य होते, त्या गटाला गुण देण्यात आले व सर्वाधिक गुण असणारे गटविजेता व उपविजेता म्हणून घोषित करण्यात आले.




उत्कर्ष महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी अर्थात १९ फेब्रुवारीला शिवजयंती दिनी, आलंय माझ्या राशीला या चित्रपटातील अभिनेते प्रणव पिंपळकर व आनंद पिंपळकर यांच्या उपस्थितीत गुणगौरव सोहळा झाला.

विद्यार्थी व्यवस्थापन मंडळाने एक महिना झोकून देऊन काम करत उत्कर्ष महोत्सवाचे नियोजन केले. वसतिगृहांतर्गत स्पर्धा घेऊन विद्यार्थी विकास केंद्र प्रमुखांनी उत्कर्ष महोत्सवाचा पाया बांधला. उत्कर्षचा उत्साह कसा कायम ठेवता येईल, यासाठी सर्वांनी प्रयत्न केले. सर्व वसतिगृहांचे पर्यवेक्षक, कार्यकर्ते व माजी विद्यार्थी यांचेही उत्तम सहकार्य लाभले. सर्वांच्या मदतीने आणि सहभागाने तीन दिवसांचा महोत्सव खेळीमेळीच्या वातावरणात उत्तमपणे पार पडला. उत्कर्ष माध्यमातून विद्यार्थ्यांनी नवीन मित्रमैत्रिणी जोडले. विद्यार्थ्यांमधील संघभावना, नेतृत्वगुण, प्रामाणिकपणा यांसारख्या कौशल्यांमध्ये भर पडली.

# लजपत भवनमध्ये एका मजल्याला मराठवाडा मित्रमंडळ कक्ष नाव

## संस्थेकडून २ कोटींची मदत, विद्यार्थ्यांना मिळणार सुविधा

**पुणे** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्यार्थी साहाय्यक समिती मोलाचे काम करीत आहे. समितीतील सुविधांचा लाभ मराठवाड्यातील गरजू,होतकरू विद्यार्थ्यांना व्हावा, यासाठी मराठवाडा मित्रमंडळ संस्थेने समितीला दोन कोटी रुपयांचीआर्थिक मदत करण्याचा निर्णय घेतला असल्याचे संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव गणगे यांनी सांगितले. समितीच्या लजपतराय भवन वसतिगृहातील एका मजल्याला मराठवाडा मित्रमंडळ कक्ष असे नाव देण्यात आले. यावेळी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या आणि एक कोटी रुपयांचा धनादेश समितीकडे सुपूर्त करण्यात आला. यावेळी मराठवाडा मित्रमंडळ संस्थेचे सरचिटणीस किशोर मुंगळे, संस्थेचे पदाधिकारी व कार्यकारिणीचे सदस्य बी. व्ही. देशमुख, डॉ. व्ही. एस. पाटील, संजय गर्गे, अण्णासाहेब पवार, प्राचार्य डी. एस. भंडारी, जितेंद्र पवार, तेज निवळीकर, रजिस्ट्रार सुभाष कदम, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड, विश्वस्त संजय अमृते, रत्नाकर मते, सुप्रिया केळवकर, तुषार रंजनकर, जिभाऊ शेवाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, कार्यकर्ते, पर्यवेक्षक आदि उपस्थित होते.



“ दोन संस्था शक्यतो एकत्र काम करत नाहीत, परंतु मराठवाडा मित्रमंडळ आणि विद्यार्थी साहाय्यक समिती यांचे कार्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उत्थानाचे असल्याने आणि दोघांचाही हेतू शुद्ध असल्यामुळे आपण एकत्र येत आहोत.

– **भाऊसाहेब जाधव**, कार्याध्यक्ष, मराठवाडा मित्रमंडळ

“ समितीमुळे हजारो ग्रामीण विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन झाले आहे. अजूनही या कामाची मोठी गरज आहे. ग्रामीण भागातील गरजू मुलींसाठी समिती नव्याने वसतिगृह बांधत आहे. दानशूर दाते, निस्पृह कार्यकर्ते आणि कृतज्ञतेच्या जाणिवेतून संस्थेशी जोडलेले माजी विद्यार्थी या सर्वांच्या प्रयत्नातून हे काम पुढे जात आहे.

– **प्रतापराव पवार**, अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती



# अनुभवले समाजातील दातृत्व

## विद्यार्थ्यांनी जमा केलेला दिवाळी निधी समितीकडे सुपूर्त

**पुणे :** विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्य गावागावापर्यंत पोचविण्याबरोबरच, समितीतील विद्यार्थ्यांना समाजात वावरण्यासाठी आत्मनिर्भर करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या दिवाळी निधी संकलन योजनेतील निधी समर्पण सोहळा ७ जानेवारी रोजी झाला. विद्यार्थ्यांनी जमवलेला १८ लाख रुपये निधी समितीचे संस्थापक डॉ. अच्युतराव आपटे यांच्या स्मृतिदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात समितीकडे सुपूर्त करण्यात आला.

ग्रामीण भागातील हुशार, होतकरू विद्यार्थ्यांची अत्यल्प दरात निवास– भोजनाची सोय करत विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांना आत्मनिर्भर बनविणे, हे विद्यार्थी साहाय्यक समितीचे उद्दिष्ट. दिवाळी निधी संकलन योजना हा त्याचाच एक भाग. समितीचे विद्यार्थी दिवाळीच्या सुटीत घरी जातात, तेव्हा निधी संकलनासाठी त्यांच्याकडे पावतीपुस्तके दिली जातात. ज्यात प्रत्येकी १०० रुपयांच्या २० पावत्या असतात. समितीसाठी निधी जमविणे, हा त्यामागील एकमेव हेतू नसून आपण जेथे राहतो, त्या समितीची माहिती, तिचे कार्य विद्यार्थ्यांनी नीट समजून घ्यावे आणि ते आपल्या गावातील, अगदी वाडीवस्तीवरील लोकांपर्यंत पोचवावे. त्यातून समितीची माहिती गावातील लोकांपर्यंत पोचेल आणि भविष्यात गरजू विद्यार्थ्यांनाही त्याचा फायदा होईल.

त्याचबरोबर निधी संकलनाच्या निमित्ताने गावातील लोकांबरोबर संवाद साधण्याची, आपले मत समोरच्याला पटवून देण्याची धिटाई विद्यार्थ्यांमध्ये येईल. समितीचे हे दोन्ही हेतू साध्य करत यंदा समितीच्या वसतिगृहात राहणाऱ्या ७०० विद्यार्थ्यांनी सुमारे १८ लाखांचा निधी संकलित केला.

आपण दिलेल्या निधीचा योग्य विनियोग होत असल्याची खात्री पटली, तर समाजातील अनेक हात मदतीसाठी पुढे येतात, गावातील केवळ प्रतिष्ठित व्यक्ती, राजकारणीच नाही तर सामान्यातील सामान्य व्यक्तीनेही या योजनेत निधी दिल्याचे विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

या योजनेत चांगले काम केलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात सत्कार करण्यात आला. समितीचे खजिनदार संजय अमृते यांनी योजनेमागील भूमिका स्पष्ट केली. यावेळी समितीचे कार्यकारी अध्यक्ष तुकाराम गायकवाड, विश्वस्त तुषार रंजनकर, समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, ज्येष्ठ कार्यकर्ते रत्नाकर मते आदी उपस्थित होते.

“ विद्यार्थ्यांना संवादी बनविणे आणि समितीच्या कार्यात त्यांना सहभागी करून घेणे, या विचारांतून गेली ३० वर्षे ही योजना सुरू आहे. यावर्षी पर्यवेक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले, यामुळे सर्वाधिक १८ लाख रुपयांचा निधी जमा झाला.

– **तुकाराम गायकवाड**, कार्यकारी विश्वस्त, विद्यार्थी साहाय्यक समिती

आठवणीचे पान

## माजी विद्यार्थ्याची कृतज्ञता



समितीचा माजी विद्यार्थी हे बिरूद लावताना अनेक विद्यार्थ्यांना अभिमान वाटतो. पुण्यात महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना समितीतील वास्तव्यात जी मूल्ये मिळाली, व्यक्तिमत्त्व विकासाची संधी मिळाली, ती कोणत्याही विद्यापीठात मिळणार नाही. स्वच्छता, समता आणि श्रमतप्रतिष्ठा ही त्रिसूत्री येथील विद्यार्थ्यांमध्ये बिंबवली जाते. समितीतून बाहेर पडताना ही शिदोरी घेऊन विद्यार्थी आपापल्या क्षेत्रात यशस्वी होतात, परंतु महत्त्वाचे म्हणजे या प्रत्येकात ओतप्रोत सामाजिक जाणीव असते.

मूळ कोकणातील (रत्नागिरी जिल्हा) आणि नोकरीनिमित्त मुंबईत स्थिरावलेले दत्तप्रसाद रायकर हे समितीचे १९८२ ते ८५ या कालावधीतील विद्यार्थी. समितीकडून खूप गोष्टी शिकायला मिळाल्याची त्यांची भावना आहे. समितीच्या माजी विद्यार्थ्यांचा २०१६ मध्ये खारघरला मेळावा झाला. त्या निमित्ताने ते पुन्हा समितीशी जोडले गेले. कौटुंबिक आणि इतर सामाजिक कामाच्या व्यापात समितीकडे पाहता आले नाही, याची सल त्यांच्या मनात होती. त्या दिवशीपासून जिवंत असेपर्यंत समितीला ठराविक रक्कम पाठविण्याचा निर्धार त्यांनी केला आणि त्या दिवसापासून अमलातही आणला.

**– चंद्रकांत कुलकर्णी**

# ...आणि माझ्यातील व्यावसायिक जागा झाला!

शिंपल्यातील मोती

बारावीचे वर्ष संपले आणि प्रश्न उभा राहिला उच्च शिक्षणाचा... आईवडील लहानपणीच मला पोरके करून गेले. एक वर्षाचा असल्यापासून मामाने सांभाळ केला. मामाच्या खांद्याला खांदा लावून शेतात काम केले आणि सोबत बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले.

मामा अगदी खेडेगावात राहत असल्याने तेथे उच्च शिक्षणाची सुविधा नव्हती. त्यामुळे पुढील शिक्षण पुण्यात घ्यायचे ठरविले. कॉलेजमध्ये प्रवेश मिळेल, पण राहायचे– खायचे कुठे? खिशात. फुटकी दमडी नाही. मग शोध सुरू केला, पुण्यात कुठे स्वस्तात राहण्याची, जेवणाची सोय होईल का याचा... समितीची माहिती इंटरनेटवरून मिळाली. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करायचा म्हणून बी.ए.साठी मॉडर्न कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि अथक प्रयत्नानंतर समितीमध्येही प्रवेश मिळाला.

समितीत आल्याबरोबर प्रथम वर्षात मला अनेक मित्र मिळाले. समितीतील शिस्त, स्वावलंबन, प्रामाणिकपणा, वक्तशीरपणा अशा अनेक जीवनोपयोगी गोष्टी आत्मसात करायला सुरवात केली.

समितीत द्वितीय वर्षी विंग मॉनिटर व अंतिम वर्षी विद्यार्थी प्रमुख म्हणून नेतृत्वाची संधी मिळाली. अभ्यासाबरोबरच मी क्रिकेटसाठी जवळच एका ॲकॅडमीत प्रवेश घेतला. तसेच अध्यात्माची आवड असल्यामुळे आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संस्थेबरोबर (इस्कॉन) जोडलो गेलो.



समितीतील तीन वर्ष संपून ग्रॅज्युएशन कधी पूर्ण झाले समजलेच नाही. आता समितीत राहण्याचा कालावधी संपला. बाहेर राहावे लागणार म्हणजे पैसे लागणार. पुन्हा प्रवेश मिळेल का, या आशेने समितीत आलो. पाल्यपालक योजनेतून समितीने माझी समितीचे देणगीदार रत्नाकर दिवाण सर यांच्या घरी राहण्याची सोय केली व जेवणाची सोय समितीमध्ये झाली. आई आपल्या मुलाला कधीच पोरके करत नाही, हे मला मायमाऊली समितीकडून कळाले.

दिवाण सर अत्यंत हुशार व्यक्तिमत्व व स्वभावाने चांगले. त्यांनी माझा स्वतःच्या नातवाप्रमाणे सांभाळ केला. मीही त्यांची आजोबांप्रमाणे काळजी घेतली, सेवा केली.

ज्या अकॅडमीमध्ये मी क्रिकेट शिकायचो, तिथल्या प्रशिक्षक सरांचे डेक्कन भागात क्रीडा साहित्याचे दुकान होते. तेथे मी पार्टटाईम जॉब करू लागलो.

दरम्यान, इस्कॉनने विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात राहणाऱ्याची, जेवणाची सोय करून त्यांना अध्यात्मिक ज्ञान देण्याचा उपक्रम चालू केला. हॉस्टेलप्रमाणे ते हा उपक्रम राबवत. त्यांना गरज होती एका रेक्टरची. समितीत विकसित झालेल्या नेतृत्व गुणामुळे या संस्थेत मी खूप चांगले काम केले होते, त्यांनी त्या हॉस्टेलचे रेक्टर पद माझ्याकडे सोपविले.

दरम्यानच्या काळात एक घटना घडली. समितीमध्ये उद्योजकता विकास हा उपक्रम चालू असताना तुषार रंजनकर सरांच्या मार्गदर्शनाने आम्ही माजी विद्यार्थी– विद्यार्थिनी स्नेहमेळाव्यात उन्हाळी पदार्थांचा एक छोटा स्टॉल लावला. त्या दिवसापुरता हा छोटासा व्यवसाय करून आम्ही खूप नफा मिळवला आणि त्याचवेळी माझ्यातील व्यावसायिक जागा झाला.

ॲकॅडमीतील ज्या सरांचे स्पोर्ट्स शॉप होते, ते मूळचे दिल्लीचे. त्यांना दिल्लीत स्पोर्ट्स मटेरियल फॅक्टरी चालू करायची होती. त्यामुळे त्यांनी परिवारासह दिल्लीला जायचे ठरविले. त्यांनी मला फोन केला. म्हणाले, ‘रणजित, मैं दिल्ली जानेवाला हूं. पुणे का पुरा शॉप तू चला. तुझे जो भी मदत लगेगी, मैं करुंगा. बस थोडे पैसे जमा करके दुकान चलाना चालू कर.’

तुझा प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची जिद्द, धडपड पाहून त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले. त्या ठिकाणी पुन्हा एकदा मनापासून मी समितीचे आभार मानले. कारण हे गुण मला दिले ते समितीनेच..

आता एवढे मोठे शॉप चालवायचे म्हणजे भांडवल लागणार. खिशात तर एक रुपया नाही. हळूहळू घरून, मित्रांकडून पैसे जमवले. रंजनकर सरांना हा प्रश्न सांगितल्यावर समितीच्या उद्योजकता विकास उपक्रमातून आर्थिक मदत झाली. सर्व भांडवल गोळा करून शॉप चालवायला घेतले.

एक विद्यार्थी, खेळाडू, अध्यात्मिक संस्थेतील कर्मचारी ते युवा उद्योजक अशी माझी ही वाटचाल चालू आहे. धडपड करून जिद्दीने यश मिळवणे आणि कुठल्याही क्षेत्रात आपला ठसा उमटवणे, हे समितीतील विद्यार्थ्यांशिवाय कोणाला जमेल, असे वाटत नाही.

**– रणजित खळदकर**

## मेळाव्यात सहभागी झाले ५५० माजी विदयार्थी



**पुणे** : विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थी– विद्यार्थिनींचा ३४ वा स्नेहमेळावा २६ फेब्रुवारीला लजपत भवनच्या प्रांगणात झाला. मेळाव्याला सुमारे ५५० विद्यार्थी उपस्थित होते.

गेल्या वर्षभरातील उपक्रमांचा अहवाल यावेळी सादर करण्यात आला. कार्यकर्त्या सुहासिनी बिवलकर, कर्मचारी संगीता गारवे यांचा मानपत्र, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. देणगीदार राजेंद्र गायकवाड यांना शाल, पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी माजी विद्यार्थ्यांच्या समितीबद्दलच्या कृतज्ञतेचे कौतुक केले. देणगीदारांच्या विश्वासामुळे, निस्पृह कार्यकर्त्यांमुळे आणि तुम्हा माजी विद्यार्थ्यांमुळे समितीचे काम हे असेच पुढे जात राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी समितीच्या भविष्यातील उपक्रमांचा ऊहापोह केला. मंडळाचे अध्यक्ष राजू इंगळे यांनी मंडळाच्या भविष्याकालीन योजनांचा आढावा घेतला. मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून माजी विद्यार्थी दत्तप्रसाद रायकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून अशोक शहाणे उपस्थित होते. त्यांनीही समितीविषयीच्या भावना व्यक्त केल्या. सूत्रसंचालन मंडळाचे सचिव सुनील चोरे यांनी केले. उपाध्यक्ष मनीषा गोसावी यांनी आभार मानले. यावर्षीच्या मेळाव्याचे प्रायोजकत्व कोकण व मुंबई विभागातील माजी विद्यार्थ्यांकडे होते.

## हेरंब कुलकर्णी, सुषमा पाध्ये यांचा गौरव

### वसुधाताई परांजपे स्मृती सामाजिक व शैक्षणिक पुरस्काराचे वितरण

**पुणे** : विकास म्हणजे महामार्ग, मेट्रो, बुलेट ट्रेन असे मानणारे शासनकर्ते, निर्ढावलेली व्यवस्था आणि उदासीन समाज यांना तोंड देत दुर्बल घटकांतील मुलांच्या उन्नतीसाठी झटणारे अनेक हात आजही समाजात आहेत. आपल्या कामासाठी स्वतःलाही पणाला लावणारे हे प्रतिभावंत प्रसिद्धीपासून मात्र दूर असतात. असेच दोन प्रतिभावंत हेरंब कुलकर्णी आणि सुषमा पाध्ये यांना विद्यार्थी साहाय्यक समिती आणि परांजपे कुटुंबीयांच्या वतीने वसुधाताई परांजपे स्मृती पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले.



विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी कार्यकारी विश्वस्त वसुधाताई परांजपे यांच्या स्मृतिदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते कुलकर्णी यांना सामाजिक कार्यासाठी, तर पाध्ये यांना शैक्षणिक कार्यासाठी पुरस्कार देण्यात आला.

धर्म, जात, भाषा, संस्कृती यांचे वैविध्य असणाऱ्या आपल्या देशात सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करणे आव्हानात्मक असले तरी गरजेचे आहे, कारण समाजाची आर्थिक प्रगती ही शिक्षण आणि आरोग्याशीच संबंधित असते. म्हणूनच महात्मा फुले, लोकमान्य टिळक, आगरकर यांनी कामाची सुरुवात शैक्षणिक क्षेत्रापासूनच केली, असे प्रतिपादन डॉ. मोरे यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. प्र. ना. परांजपे, विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड, ज्येष्ठ कार्यकर्ते रवींद्र नामजोशी, परांजपे कुटुंबीय, समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

विद्यार्थी कट्टा

## स्वत:ची नव्याने ओळख करून देणारा ‘मनोवेध’



सप्टेंबर २०२२ ते फेब्रुवारी २०२३ या काळात रोटरी– पुणे मेट्रो क्लब आणि महर्षी कर्वे संस्थेचे बाया कर्वे स्त्री संशोधन केंद्राच्या सहयोगाने विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थी– विद्यार्थिनींसाठी ‘मनोवेध’ हा प्रकल्प राबविण्यात आला. या प्रकल्पात महाराष्ट्रातील अनेक छोट्यामोठ्या गावांतून शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या आणि प्रथमच घरापासून दूर वसतिगृहात राहणाऱ्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी काही सत्रे आयोजित केली होती. या प्रकल्पांतर्गत सहा महिन्यांत मन, भावना, ध्येय निश्चिती, संघर्ष, लिंगभाव, संवेदनीकरण, स्वातंत्र्य अशा विविध विषयांवर एकूण ९ सत्रे झाली. समितीच्या सर्व वसतिगृहांतील एकूण १०७ विद्यार्थी– विद्यार्थिनींनी या प्रकल्पात सहभाग घेतला.

या मनोवेध प्रकल्पात आपल्या मनाची ओळख कशी करून घ्यावी, याविषयी मार्गदर्शन डॉ. पल्लवी कासंडे, स्वाती रानडे आणि अनघा कुलकर्णी आदींनी केले.

मनाविषयी तसेच आपल्याला जे विविध गोष्टीचं स्वतंत्र दिलं आहे, ते कशा प्रकारे वापरता येईल याबद्दल सांगण्यात आले. सत्कारात्मक विचार, त्या विचारांची मांडणी, शिक्षण, निर्णय, स्वतःचा विकास, वेशभूषा याबद्दल सांगितले. आपले मन कसे नियंत्रित ठेवता येईल आणि वाईट विचारांपासून त्याला कसे दूर ठेवता येईल, स्वतःमध्ये कशा प्रकारे सुधारणा करता येईल, या संदर्भात एक ॲप मुलांना तयार करायला सांगितले. मुलांनी mind developer, mind manager अशी विविध नावे देऊन सुंदर ॲप कागदावर तयार करून दिले. मनोवेध प्रकल्पाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना स्वतःची नव्याने ओळख करून घेण्याची संधी मिळाली.

ता. १५ फेब्रुवारीला प्रकल्पाचा समारोप झाला. प्रकल्पात सहभागी सर्वांना प्रमाणपत्र देण्यात आली. प्रातिनिधिक स्वरुपात पाच विद्यार्थ्यांना समारोप कार्यक्रमात प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

**अनिल लाकडे,** वि. वि. के. प्रमुख, लजपत संकुल

समिती वृत्त

## व्यवस्थापनाच्या विद्यार्थ्यांना नेतृत्व कौशल्याचे धडे



विद्यार्थी साहाय्यक समितीतील व्यवस्थापनाच्या विद्यार्थ्यांसाठी ‘नेतृत्व कसं करावं?’ या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळा १२ फेब्रुवारी रोजी फुलगाव येथील इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट येथे झाली. कार्यशाळेत समितीच्या सर्व वसतिगृहांतील एकूण ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेची सुरुवात पसायदानाने झाली. समितीचा विद्यार्थी सौरभ खुळे याने नियोजनबद्ध रूपरेषा सुचवली. इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्टचे कार्यकर्ते अविनाश पाटील यांनी संस्थेचा इतिहास, वर्तमानस्थिती आणि इतर योजनांबद्दलही माहिती दिली. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात समितीचे विश्वस्त तुषार रंजनकर यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर १० – ११ विद्यार्थ्यांचे गट करून विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांचे परीक्षण कुंदन पठारे यांनी केले. त्यानंतर इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या Home For destitute या प्रकल्पाला विद्यार्थ्यांनी भेट दिली.

दुसऱ्या सत्रात सुमित्रा सदनची विद्यार्थी प्रमुख अंगारकी मांडे हिने ‘नेतृत्व म्हणजे काय?’ या विषयावर मार्गदर्शन केले. लजपत वसतिगृहातील विद्यार्थी प्रमुख नीलेश तिकांडे याने व्यवस्थापन करताना येणाऱ्या अडचणी व त्यावर उपायांबद्दल सांगितले. विद्यार्थी विकास केंद्र समन्वयक उत्कर्षा दरेकर हिने अनुभव कथन केले. कार्यशाळेच्या समारोपानंतर इन्वेस्टमेंट इन मॅन ट्रस्टच्या ‘ईश्वरी’ प्रोजेक्टला विद्यार्थ्यांनी भेट दिली.

## ‘गर्जे मराठी’ संस्थेबरोबर समितीचा सामंजस्य करार

‘गर्जे मराठी’ या अमेरिकास्थित संस्थेबरोबर विद्यार्थी साहाय्यक समितीचा सामंजस्य करार झाला. समितीच्या डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहात झालेल्या या कार्यक्रमात गर्जे मराठी संस्थेचे आनंद गानू, माधव दाबके, समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड, विश्वस्त, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. ‘गर्जे मराठी’ संस्थेतर्फे जगभरातील मराठी उद्योजकांना विविध पातळ्यांवर सहकार्य केले जाते. विद्यार्थी साहाय्यक समितीने उद्योजकता विकास उपक्रम सुरू केल्याबद्दल आनंद गानू यांनी अभिनंदन केले. एकलव्य उपक्रमांतर्गत विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या प्रेरणादायी व्याख्यानांचे व्हिडिओ विद्यार्थ्यांना पाहण्या– ऐकण्यासाठी उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे.